१६ ते ३१ जुलै २०२० । किंमत २५ रु.

परिवर्तनाचा वाटसरु

कोव्हिड १९ आणि लिंगभाव

दुहेरी संकट

प रि व र्त ना चा

वाटसरू

वर्ष २० / अंक ६
किं. २५ रु. / १६ ते ३१ जुलै २०२०

ISSN: 2250-3145

युजीसी केअर लिस्टमध्ये परिवर्तनाचा वाटसरू पाक्षिकाचा
मल्टिडिसिप्लिनरी या कोटीक्रमांतर्गत समावेश केला आहे.

परिवर्तनाचा
वाटसरू

संपादकीय ५

कोव्हिड १९ आणि लिंगभाव : दुहेरी संकट
नवऱ्याबरोबर लॉक झालेल्या डाऊन बायका ९
अनामिका १

कोरोनाचा काळ नि नवऱ्याचा भार २१
अनामिका २

आपत्ती : स्त्रियांसाठी दुहेरी मार ३७
दिलीप चव्हाण

ऑनलाईन शिक्षणात स्त्रियाच वंचित? ५१
प्रवीण घोडेस्वार

ऑनलाईन शिक्षणात स्त्रियाच वंचित?

प्रवीण घोडेस्वार

कोरोना विषाणू साथीच्या जागतिक महामारीमुळे सबंध जगात अनेक प्रश्न, अडचणी नि समस्या निर्माण झाल्या आहेत. जगभरात शिक्षण क्षेत्रावरही याचा कमालीचा परिणाम झालेला आहे. अनेक प्रगत तसेच पाश्चिमात्य देशांमध्ये या साथीच्या आधीदेखील सुरू असलेल्या ऑनलाइन शिक्षणाचा पर्याय आपल्या देशातही अंमलात येत आहे. शासन, विविध शैक्षणिक संस्था, शिक्षण क्षेत्रातील काही अभ्यासक कोरोना जागतिक महामारीच्या पार्श्वभूमीवर ऑनलाइन शिक्षण देण्याच्या पर्यायाला संमती देत आहेत. या संदर्भात दोन मतप्रवाह दिसून येत आहेत. एक समर्थनाचा तर दुसरा विरोधाचा. बंगळूरू इथल्या National Institute of Mental Health Neuroscienceमधल्या तज्ज्ञांच्या समितीने दिलेल्या अहवालानुसार कर्नाटक राज्य शासनाने ऑनलाइन शिक्षणावर इयत्ता सातवीपर्यंत बंदी घातली आहे. शिवाय जागतिक आरोग्य संघटनेने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्येही याचा समावेश नसल्याचे या संस्थेचे बी. एन.

लेखक नाशिकच्या य. च. म. मुक्त विद्यापीठाच्या मानव्य विद्या व सामाजिक शाखेत सहयोगी प्राध्यापक आहेत.
gpraveen18feb@gmail.com

गंगाधर यांनी म्हटले आहे. यास्तव गेल्या काही दिवसांपासून देशभरातील विविध घटक शासनाच्या ऑनलाइन शिक्षण आणि परीक्षांना विरोध करीत आहेत. सरकार शिक्षणाचे खासगीकरण करून समाजात भेदभाव आणि सामाजिक विषमता आणत असल्याचा आरोपदेखील करण्यात येत आहे. देशभरात कोरोनाचे वाढते संक्रमण लक्षात घेता केंद्र सरकारने प्राथमिक व उच्च शिक्षण संस्थांना ऑनलाईन वर्ग घेण्याचे आदेश दिले होते. 'ग्रामीण' भागात राहणारे आणि ज्यांना ऑनलाईन शिक्षण घेणे कठीण आहे अशा विद्यार्थ्यांना दूरदर्शनच्या ३२ वाहिन्यांच्या माध्यमातून शिक्षण दिले जाईल, असे केंद्रीय मनुष्यबळ मंत्री रमेश पोखरीयाल यांनी सांगितले होते. पण शासनाची ही उपाययोजना यशस्वी ठरेल असे वाटत नाही.

१८ जून रोजी केरळच्या मल्लापुरम जिल्ह्यात एका दहावीच्या मुलीने आत्महत्या केली कारण ऑनलाइन वर्गांमुळे तिला अनेक अडचणींचा सामना करावा लागला होता. तिला शिकवलेले समजत नव्हते. मुलीच्या कुटुंबीयांचे म्हणणे आहे की, ती टीव्हीच्या माध्यमातून ऑनलाईन वर्ग करत असे आणि त्या काळात वीज कपातीमुळे ती अस्वस्थ होती. ह्या मुलीने वडिलांकडे स्मार्टफोन घेऊन देण्याची मागणी केली होती. पण लॉकडाऊनमध्ये रोजगार गेल्यामुळे तिच्या वडीलांना तिला फोन घेऊन देणं शक्य झालं नाही. याआधी २ जूनला ऑनलाइन वर्गात भाग घेता न आल्याने केरळमधीलच अजून एका दहावीच्या मुलीने आत्महत्या केली होती. या घटनांनंतर देशातील ऑनलाइन शिक्षणाचे स्वरूप

आणि पायाभूत सुविधांबाबत अनेक प्रश्न समोर आलेले आहेत. शासनाला देशात इ-शिक्षणाची अंमलबजावणी करणे सुलभ आहे का, असाही प्रश्न निर्माण झाला आहे. तर भारतीय शिक्षणाची सध्याची रचना ऑनलाइन प्रणालीने बदलली जात आहे, असेही एका वर्गाकडून कौतुकाने म्हटले जात आहे.

देशाच्या काही ग्रामीण भागात लोक अजूनही सौर ऊर्जेचा वापर करतात. अगदी ते त्यांचे मोबाईल फोन चार्ज करण्यासाठीदेखील त्यावर अवलंबून असतात. ग्रामीण भागात ऑनलाइन शिक्षण देणं सहज नाहीये कारण बऱ्याच भागात विजेच्या उपलब्धतेची निर्धारित अशी वेळ नसते. येथे सकाळ, संध्याकाळ किंवा रात्री केव्हाही वीज उपलब्ध होत असते. ज्या आठवड्यात रात्री वीज असेल तेथल्या मुलांना डिजिटल शिक्षण घेणे कसे शक्य होईल? भारतात ९९ टक्के घरांमध्ये वीज पोहोचली असल्याचा दावा शासनाने केला असला तरी वस्तुस्थिती समजून घेण्याची गरज आहे. म्हणजे वीज घरात पोहचलेली आहे पण ती सदा सर्वकाळ उपलब्ध असल्याचे प्रमाण कमी आहे. यातही वेगवेगळी राज्ये, केंद्र शासित प्रदेश यानुसार तफावत दिसून येते.

सन २०१७-१८मधील राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या शिक्षणावरील अहवालात केवळ २४ टक्के कुटुंबांकडे इंटरनेट सुविधा उपलब्ध असल्याचे नमूद केले आहे. भारतातील ६६ टक्के लोकसंख्या गावात राहते. ग्रामीण भागातील केवळ १५ टक्क्यांहून थोड्या अधिक कुटुंबांकडे इंटरनेट सेवा उपलब्ध आहे. दुसरीकडे शहरी कुटुंबांमध्ये ही संख्या ४२ टक्के आहे.

'इंटरनेट ॲण्ड मोबाइल असोसिएशन ऑफ इंडिया'ने २०१९च्या अहवालात म्हटले आहे की, ६७ टक्के पुरुष आणि ३३ टक्के महिला इंटरनेटचा वापर करतात. ही असमानता ग्रामीण भागात अधिक प्रमाणात आढळून आली आहे. ग्रामीण भागात ७२ टक्के पुरुष आणि २८ टक्के स्त्रिया इंटरनेट वापरतात. 'जेंडर इंडेक्स रिपोर्ट २०२०'नुसार भारतातली लैंगिक विषमता जगातील सर्वात वाईट म्हणता येईल अशा वर्गवारीतली आहे. स्त्रियांचा आर्थिक सहभाग, शिक्षण, आरोग्य आणि राजकीय सबलीकरणाच्या उपायांच्या बाबतीत भारत १५३ देशांपैकी ११२ क्रमांकावर आहे. दुसरीकडे, राष्ट्रीय महिला आयोगाच्या आकडेवारीनुसार लॉकडाऊन दरम्यान महिलांवरील सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे. या क्षेत्रातल्या जाणकारांचे मते ऑनलाईन शिक्षण सुरू झाल्यानंतर सायबर गुन्हे अजून वाढण्याची शक्यता आहे. तसेच अभ्यासासाठी अनुकूल वातावरण असणे फार आवश्यक असते. परंतु सर्व विद्यार्थ्यांकडे घरात वाचन आणि लेखन करण्यासाठी स्वतंत्र जागा नाही. एका अहवालानुसार, भारतातील ३७ टक्के कुटुंब एकाच खोलीत राहतात. यावरून असे लक्षात येते की या अनागोंदीच्या परिस्थितीत अनेक कुटुंबांसाठी ऑनलाइन शिक्षण ही एक लक्झरी असणार आहे. या संक्रमणाच्या काळात कामगार, मजूर, कष्टकरी वर्ग मोठ्या संख्येने आपल्या मूळ गावी परत गेला आहे. रोजगार गमावलेल्या या वर्गाला आपल्या पाल्यांना, विशेषतः मुलींना ऑनलाईन शिक्षण देणे फार अवघड होणार आहे. 'युनेस्को'ने सुमारे ७०.६ कोटी विद्यार्थ्यांकडे ऑनलाइन

शिक्षण घेण्यासाठी आवश्यक त्या सुविधा नसल्याचे आपल्या अहवालात नमूद केलं आहे.

आपल्या भारतीय समाजात विशेषतः ग्रामीण भागात आणि उत्तरेकडील राज्यांमध्ये काही समाजात अजूनही मुलींना स्मार्ट फोन दिला जात नाही. येथे ऑनलाईन शिक्षण देणे स्त्रियांना शिक्षणापासून दूर लोटणारे ठरू शकते. ऑनलाईन शिक्षणाला प्रोत्साहन दिल्याने स्त्रिया शिक्षणापासून वंचित राहतील की काय अशी भीती वाटते. जर कुटुंबातील एखाद्या मुलाला किंवा मुलीला फोन किंवा इन्स्ट्रुमेंट देण्याची वेळ आली तर ते आधी मुलाला दिले जाते. मग शक्य असेल तर मुलीची मागणी पूर्ण केली जाते. आपली सध्याची शिक्षण प्रणाली समाजाच्या इतर घटकांशी संबंध जोडण्याची आणि त्यांची संस्कृती जाणून घेण्याची संधी देत होती. याचा फायदा मुलींना व्हायचा. सध्याच्या शिक्षण प्रणालीमुळे त्या घराबाहेर पडत होत्या आणि आजूबाजूच्या गोष्टींविषयी त्यांना माहिती होऊन घराबाहेरच्या जगाशी थोडा का होईना त्यांचा संपर्क येत होता. परंतु ऑनलाईन शिक्षणानंतर ही परिस्थिती बदलणार आहे. यानंतर, मुलींना पुन्हा त्यांच्या घरात बंदिस्त केले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांच्या घराबाहेर पडण्यावर मर्यादा येतील. इतर लोकांना भेटण्याची आणि विचारांचे आदानप्रदान करण्याची त्यांची संधी नि उत्सुकता नष्ट होईल अशी भीती वाटते. परिणामी स्त्रियांच्या स्वातंत्र्यावरही गदा येऊ शकते. घरातच राहावे लागल्याने साहजिकच त्यांच्यावर घरकामाचा अतिरिक्त बोजादेखील पडणार

असल्याची शक्यता नाकारता येत नाही. कोणत्याही आपत्तीच्या काळात पुरुषांपेक्षा स्त्रियांना अधिक अडचणी आणि समस्यांचा सामना करावा लागतो. कोरोनाच्या या आपत्ती काळातही अशीच परिस्थिती निर्माण झाली असल्याचे विविध घटना आणि प्रसंगांवरून दिसून येत आहे. शहरी उच्चवर्गीय, मध्यमवर्गीय समाजातल्या मुलींना याचा फारसा फटका बसणार नाही. पण शहरातल्या निम्नवर्गीय, झोपडपट्टीत राहणाऱ्या, गरीब, अनुसूचित जाती, जमाती, भटक्या-विमुक्त जाती, मागासवर्गीय व अल्पसंख्यांक समाजाच्या मुलींना याची झळ मोठ्या प्रमाणात बसेल. तसेच आधी म्हटल्याप्रमाणे ग्रामीण भागातल्या मुलींच्या शिक्षणातही यामुळे अडथळा येणार आहे. त्यांच्या सामाजिक आंतरक्रिया, सामाजिक संपर्क यांचा संकोच होईल. हे टाळण्यासाठी राज्याच्या शालेय शिक्षण, उच्च शिक्षण, महिला विकास आणि सामाजिक न्याय मंत्रालय यांनी एकत्र येऊन या सामाजिक वास्तवाचा अभ्यास केला पाहिजे. या अभ्यासातून परिस्थितीचे आकलन करून या अनुषंगाने योग्य त्या उपयायोजना, धोरण आखण्याची गरज आहे. शासनाला या कार्यात शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, कार्यकर्ते, अभ्यासक, विचारवंत, शिक्षक, शैक्षणिक संस्था चालक यांचीही मदत होईल. शासनाने त्यांना या समस्येवर तोडगा काढण्यासाठी सहभागी करून घेतले पाहिजे. अन्यथा देशातील बहुसंख्य समाज घटकातील मुली पुन्हा एकदा शिक्षणापासून वंचित राहण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.

●

Registered
Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP -37
R.N.I. No. MAHMAR/2001/09622 / Postal Regd. No. PCW/006/2018-2020
Posted at Pune PSO, GPO, Pune-411001
Published and posted on 1st and 16thof EveryMonth.
परिवर्तनाचा वाटसरू, १६ जुलै २०२० Date of Publication & Posting : 16-7-2020

- पाक्षिक परिवर्तनाचा वाटसरू वर्गणी
- वाटसरूचे २०१० ते २०१९चे अंक

हे सर्व एकाच संकेतस्थळावर, ऑनलाईन मिळवा, तेही घरपोच!

www.pvatsaru.com

वर्गणीचे दर

१ वर्षासाठी वर्गणी : ₹ ४५०
३ वर्षांसाठी वर्गणी : ₹ १२००
१० वर्षांसाठी वर्गणी : ₹ ३५००
सॉफ्ट कॉपीसाठी
वार्षिक वर्गणी : ₹ ३५०
सॉफ्ट + छापील अंकाची
वार्षिक वर्गणी : ₹ ६५०

जुन्या अंकांतील लेख
(सॉफ्ट कॉपी) उपलब्ध ४५० रु.
(तीन महिने)

(सध्या २०१० ते २०१९चे सर्व अंक उपलब्ध आहेत.
१९९९ ते २००९ च्या अंकांचे काम सुरू आहे.)

'परिवर्तनाचा वाटसरू' हे पाक्षिक मालक-प्रकाशक अभय कांता यांनी नर्मदा ऑफसेट, नारायण पेठ, पुणे ३० येथे छापून ५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ए, कसबा पेठ, पुणे ११ येथे प्रसिद्ध केले.